Exh. 7

## को.वि. श्रीमान दिवाणी न्यायधिश साहेब, कनिष्ठ स्तर, सावनेर

नि.दि.मु.नं. /२०२५

दाखल ता. १९/१२/२०२५

श्री. ज्ञानेश्वर देवरावजी बोनसुले

**विरूध्द**

श्री. नितीन यादवराव बोनसुले व इतर–१

### बंधनकारक सुचनापत्र देण्याकरीता सुट मिळण्याबाबत अर्ज

वादीचा/अर्जदाराचा दावा येणेप्रमाणे :–

१) असे की, वादी व प्रतिवादी नं. १ व २ वरील प्रमाणे राहणारे आहेत. वादी यांनी प्रतिवादी नं. १ व २ यांचे विरूध्द घोषणा व कायम मनाई हुकूमाचा दावा दाखल केला असून सोबतच मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे.

२) असे की, प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी नं. २ यांचेकडे मामलतदार कायदयाअंतर्गत अर्ज सादर केला होता. त्यावरून प्रतिवादी नं. २ यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी आदेश पारीत केला होता, त्या आदेशाविरूध्द वादी यांनी दिवाणी न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे, त्यामध्ये प्रतिवादी नं. २ (महाराष्ट्र शासन तर्फे) यांना पक्ष करण्यात आलेला आहे. तरी त्यांना बंधनकारक सुचनापत्र पाठविणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणामध्ये आदेशाविरूध्द प्रकरण करणे गरजेचे असल्याने लवकरात लवकर सदर आदेशाविरूध्द मनाई हुकूम घेणे गरजेचे असल्याने त्यापासून सुट देण्यात यावी.

३) त्यामुळे वादी यांना प्रतिवादी नं. २ यांना बंधनकारक सुचनापत्र कलम १८० बॉम्बे व्हिलेज पंचायत ॲक्ट नुसार पाठविण्यापासून सुट देवून दावा दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

करीता हा अर्ज करण्यात येत आहे.

प्रार्थना :–तरी को.वि. साहेबांना नम्र विनंती आहे की, त्यांनी वादीचा अर्ज मंजूर करून प्रतिवादी नं. २ विरूध्द बंधनकारक सुचनापत्र पाठविण्यास सुट देवून दावा दाखल करण्याची परवानगी दयावी ही विनंती.

Order
Application is allowed.
SANJEEV AKARAM SARDAR — Digitally signed by SANJEEV AKARAM SARDAR
CJSD Saoner
01-01-2026

कळमेश्वर
दिनांक १९/१२/२०२५

(signature)
वादीतर्फे अधिवक्ता

(signature)
वादी

Scanned with OKEN Scanner